कला व वाणिज्य महाविद्यालय

प्रकल्प - २०१५ - 16

बी.ए. भाग - ३. पेपर नं - 12

सेमिस्टर - 6

प्रकल्पाचे नाव :-

गंगा नदी पाणी वाटप तंटा

प्रकल्प

सादर कर्ते

मार्गदर्शक :- डी. आर. गोडसे

| | विद्यार्थीनीचे नाव | रोल नं | सही. |
|---|---|---|---|
| | पटेल गुलफशहा शमरुद्दीन | 597 | G.S.Patel. |
| | बाडे पुजा देवानंद | 592 | P.Bade |
| | मोकाशी दिपाली रामलिंग | 594 | D.R.Mokash. |
| | | | |

Scanned with CamScanner

PAGE :
DATE : / /

## गंगा नदी पाणी वाटप तंटा

### गंगा नदी :-

भारतातील मोठ्या नद्यांपैकी गंगा एक नदी असून महत्वाची आहे. गंगा नदी हिमालय पर्वतात ३७९२ मीटर उंचीवर उगम होऊन बांगला देशातून बंगालच्या उपसागरात मिळते. या नदीच्या खोऱ्यातील जमीन अत्यंत सुपीक असून या नदीला बारही महिने भरपूर पाणी असते. भारताच्या ५०% व बांगला देशाच्या ३३% लोकसंख्या या नदीच्या खोऱ्यात आहे. भारताच्या ४३% सिंचन क्षेत्र या नदीच्या खोऱ्यात आहे. या नदीच्या खोऱ्यात ऊस, तांदूळ, गहू इत्यादी पिके मोठ्या प्रमाणात होतात. १०० नगरी ठिकाणे या नदीच्या खोऱ्यात वसली आहेत.

### फराक्का धरण :-

फराक्का धरण हे गंगा नदीवर देशाच्या सीमेपासून १६.५ किमी अंतरावर प. बंगालमध्ये नयापाड नवाबगंज जिल्ह्यात आहे. या धरणाचे काम १९६१ मध्ये सुरु झाले आणि त्याच्या पाण्याचा वापर २१ एप्रिल १९७५ पासून सुरु झाला. या धरणाची लांबी २२४० मीटर आहे. या धरणापासून ४० किमी लांब कालव्याने भगीरथी हुगळी नदीत पाणी सोडले जाते. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश दर सेकंदाला पडणारे ४०० घन मीटर पाणी गंगानदीतून हुगळी नदीत सोडण्यात येते. या मागील आणखी एक उद्देश म्हणजे कोलकाता बंदरात साठणारा गाळ दूर करणे होय.

अशा प्रकारे फराक्का धरण प्रामुख्याने पं. बंगाल या राज्याच्या दृष्टीने विशेष महत्वाचे आहे यावर अन्नधान्याचे उत्पन्न मासेमारी जलवाहतूक पर्यावरण इत्यादी गोष्टी अवलंबून आहेत.

DATE : / /

## गंगा नदी पाणी वाटप तंटा :-

गंगा नदीचे विविध दृष्ट्या महत्त्व पाहता भारत व बांगला देशाच्या दरम्यान पाणी वाटपाविषयी तंटा निर्माण झाला आहे. फराक्का धरणामुळे बंगाल देशाकडे जाणाऱ्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. म्हणून भारताकडून बांगला देशाला मिळणाऱ्या पाण्याविषयी वाद तंटा आहे.

फराक्का धारण पूर्ण झाल्यावर या दोन देशांनी असे ठरविले की वर्तमान या एप्रिल ते 31 मे दरम्यान सलग या दिवस बांगला देशाला पाणी देईल याविषयीचा करार 15 एप्रिल 1975 रोजी भारत बांगला देश दरम्यान झाला.

परंतु बांगल देशाचे तत्कालीन नेते शेख मुजिबर रहमान यांच्या निधनानंतर दोन्ही देशाचे संबंध बिघडले. तरी भारताने बांगला देशाला ठरलेल्या वेळेनंतरही पाणी देणे सुरूच ठेवले 1976 मध्ये निर्माण नवनिर्माण बांगला देशात जाण्याचा प्रश्न निर्माण झाला म्हणून बांगला देशाने 26 नोव्हेंबर 1976 मध्ये या दोन्ही देशाच्या दरम्यान पाणी वाटपाची बोलणी सुरू झाली.

PAGE :

DATE : / /




Scanned with CamScanner